**नि.दि.दा.क्र. ५६/२०१८** **नि. क्र. ६८**

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – प्रदीप गंगाधर भोकरे

वय – ५२ वर्ष धंदा – नोकरी

पत्ता – शिव छत्रपती नगर, कामठी, जि. नागपूर

**सरतपास शपथेवर वादी तर्फे वकील श्री.अग्रवाल यांच्याकडून**

१. मी नगर परिषद कामठी येथे कनिष्ठ लिपीक या पदावर सन २०१२ पासून कार्यरत आहे. या न्यायालयाकडून आमच्या कार्यालयाला साक्षसाठी न्यायालयात येण्याकरिता व सोबत संबंधित कागदपत्र आणण्यासाठी समन्स/जमानती वॉरंट आला होता. मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी मला न्यायालयात जाऊन साक्ष देण्याकरिता अधिकार पत्र दिलेले आहे. आता मला दि.०४.०३.२०२५ रोजीचे अधिकार पत्र दाखविले. ते तेच असून त्यावर मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांची सही आहे. तसेच त्यावर माझे नाव लिहीलेले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६९** देण्यात येते. आज रोजी मी माझ्यासोबत घर क्र.एन.एल.५५ व ५५–अ चे कर आकारणी पत्रकाची प्रमाणित प्रत आणली आहे. त्यावर मालक म्हणून लक्ष्मीचंद्र मातादीन यांचे नाव आहे व भोगवटदार म्हणून लक्ष्मी राधेश्याम अग्रवाल व कांताप्रसाद अग्रवाल यांचे नाव नमूद आहे. त्यास **नि.क्र.७०** देण्यात येते. आज रोजी मी नगर परिषद कामठी यांनी लक्ष्मीचंद्र मातादीन व कांताप्रसाद अग्रवाल (घर क्र.एन.एल.५५ व ५५–अ बाबत) यांना कर आकारणी संदर्भात पाठविलेले मागणी बिलाची प्रमाणित प्रत आणली आहे. त्यास **नि.क्र.७१** देण्यात येते. तसेच मी सोबत मूळ असेस्मेंट रजिस्टर आणले आहे. आता मी नि.क्र.७० व असेस्मेंट रजिस्टर मधील नोंद पडताळून पाहली असता बरोबर आहे. दावा मिळकत नगर परिषदेने लिज वर दिलेली नाही. दावा मिळकतीची जागा शासकीय आहे, परंतु त्यावरील बांधकाम खाजगी आहे. नगर परिषद दावा मिळकतीचा कर घेते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ तर्फे श्री. सौरभ काळे वकील यांच्यातर्फे**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६९ वर नगर परिषदेचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात साक्ष देण्यासाठी आधी नगर परिषदेमध्ये ठराव घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.७० व ७१ वर प्रमाणित निर्गमित केल्याची तारीख नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.७०

व ७१ वर माझी सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६९ मध्ये मूळ असेस्मेंट रजिस्टर मी न्यायालयात साक्ष कामी घेऊन जावे असे नमूद नाही. मी अतिक्रमण विभाग, कर विभाग, होर्डींग पोस्टर बॅनर विभाग येथे लिपीक म्हणून काम करतो. नि.क्र.७१ वर घर क्र. २७/एन.एल/५५ अ असा नमूद आहे. नि.क्र.७० व ७१ मध्ये नमूद व्यक्ती जिवंत आहे किंवा नाही याबाबत नगर परिषदेने सर्वे केलेला नाही. दावा मिळकतीवर कुठलाही कर थकीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर पावती वर पैसे भरणा-याचे नाव नमूद नसते तर अभिलेखावर नोंद असलेल्या व्यक्तीचे नाव असते. नि.क्र.७० वर २०११ मध्ये त्यावरील नावांची नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर कोणी बांधकाम केले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत लिज वर आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे  नाही की, मी मनिष अग्रवाल यांना आधीपासून ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मनिष अग्रवाल यांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.६ तर्फे श्री.कुशवाह वकिल**

नाकारला.

**दावा प्रतिवादी क्र.३, ७ ते १२ विरुद्ध एकतर्फा झाल्यामुळे उलटतपास नाही.**

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.03.06 18:09:07 +0530

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –०६/०३/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी.